भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# शारीरिक इजा (भरपाई विमा) अधिनियम, १९६३

**(सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ३७)**

[२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान]

# The Personal Injuries (Compensation Insurance) Act, 1963

**(Act No. 37 of 1963)**

*[As in force on the 26th February, 2004]*

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन मुंबई
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

**[किंमत :** रुपये १३.००**]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि पर्सनल इन्ज्युरीज (कॉम्पेन्सेशन इन्शुअरन्स) ॲक्ट, १९६३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर, २००४ यात पृष्ठ ७१ ते ८१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :

दिनांक १४ ऑक्टोबर, २००४

**टी. के. विश्वनाथन,**

सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Personal Injuries (Compensation Insurance) Act, 1963 as on the 26th February, 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette* of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October, 2004 on pages 71 to 81.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :

Date 14th October, 2004

T. K. VISWANATHAN,

Secretary to the
Government of India.

# शारीरिक इजा (भरपाई विमा) अधिनियम, १९६३

## कलमांचा क्रम

**कलमे**


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**या अधिनियमाखाली प्रदेय असणारी भरपाई**

३. ज्यांना हा अधिनियम लागू होतो ते कामगार.

४. या अधिनियमाखाली प्रदेय असलेली भरपाई कोणी व कशी द्यावयाची.

५. हा अधिनियम किंवा १९६२ चा अधिनियम ५९ याखालील अधिकाराहून अन्यथा भरपाई मिळवण्याच्या अधिकारावरील मर्यादा.

६. शसकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधातील विशेष उपबंध.

७. भरपाईची रक्कम.

प्रकरण तीन

**शारीरिक इजा (भरपाई विमा) योजना**

८. शारीरिक इजा (भरपाई विमा) योजना.

९. सक्तीचा विमा.

१०. प्रकर्ते व कंत्राटदार.

११. केंद्र सरकारने एजंट नेमणे.

१२. विवक्षित विमाधंद्याला मनाई.

१३. शारीरिक इजा (भरपाई विमा) निधि.

प्रकरण चार

**संकीर्ण**

१४. माहिती मिळवण्याची केंद्र सरकारची शक्ती.

१५. न भरलेल्या अधिमूल्याची वसुली.

१६. नियोक्ता विमा काढण्यास चुकला असेल तर त्या बाबतीत भरपाई देणे.

१७. अभियोगांबाबतच्या मर्यादा.

१८. अपराध आपसांत मिटवणे.

१९. कोणतीही शिक्षा करण्याची दंडाधिकाऱ्याची शक्ती.

२०. वैध कार्यवाहीस आडकाठी.

२१. नियोक्त्यांना सूट देण्याची शक्ती.

२२. नियम करण्याची शक्ती.

२३. अडचणींचे निवारण करण्याची शक्ती.

२४. योजना संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवणे.

**अनुसूची.**

शब्दसूची : इंग्रजी-मराठी,

मराठी-इंग्रजी.

# शारीरिक इजा ( भरपाई विमा ) अधिनियम, १९६३

**( १९६३ चा अधिनियम क्रमांक ३७ )**

(२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान) [८ ऑक्टोबर, १९६३]

**शारीरिक इजा सोसाव्या लागणाऱ्या कामगारांना भरपाई देण्याबद्दल नियोक्त्यांवर दायित्व ठेवण्यासाठी व अशा दायित्वाबाबत नियोक्त्यांचा विमा उतरवण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या चौदाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :---

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास 'शारीरिक इजा (भरपाई विमा) अधिनियम, १९६३' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [१]दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर.— **व्याख्या.**

(क) "नियोक्ता" यामध्ये निगमित असलेला किंवा नसलेला कोणताही व्यक्तिनिकाय आणि नियोक्त्यांचा कोणताही व्यवस्थापन एजंट आणि मृत नियोक्त्यांचा वैध प्रतिनिधी यांचा समावेश आहे, आणि कामगाराने ज्या व्यक्तिशी नोकरीची किंवा शिकाऊ उमेदवाराची संविदा केलेली आहे त्या व्यक्तीने त्या कामगाराच्या सेवा दुसऱ्या व्यक्तीला तात्पुरत्या उसनवार दिलेल्या असून किंवा भाड्याने दिलेल्या असून जेव्हा तो कामगार त्या दुसऱ्या व्यक्तीसाठी काम करत असेल तेव्हा त्याचा अर्थ, ती पहिली व्यक्ती, असा आहे ;

(ख) "निधी" याचा अर्थ, कलम १३ खाली स्थापन केलेला "शारीरिक इजा (भरपाई विमा) निधी", असा आहे ;

(ग) "प्राप्तीसाठी व्यवसाय करणारी व्यक्ती" व "शारीरिक इजा" यांना "शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२" (१९६२ चा ५९) यामध्ये अनुक्रमे त्या शब्दप्रयोगांना नेमून दिलेले अर्थ आहेत ;

(घ) "अधिसूचना" याचा अर्थ, राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना, असा आहे ;

(ङ) "अंशतः निःसमर्थता" याचा अर्थ, निःसमर्थता तात्पुरत्या स्वरूपाची असेल तर, इजा पोचली त्यावेळी कामगार जेथे कामाला होता त्या कामधंद्यातील त्यांची अर्जनक्षमता ज्यामुळे कमी होते अशी निःसमर्थता आणि निःसमर्थता कायमस्वरूपाची असेल तर, त्यावेळी जो कामधंदा पत्करण्यास तो सक्षम होता अशा कोणत्याही कामधंद्यातील त्याची अर्जनक्षमता ज्यामुळे कमी होते ती निःसमर्थता, असा आहे :

परंतु, जेव्हा अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक इजेच्या किंवा इजांच्या कोणत्याही संयोगाच्या उल्लेखासमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे निःसमर्थतेची टक्केवारी किंवा एकंदर टक्केवारी ही शंभर टक्क्यांपेक्षा कमी असेल तेव्हा, अशा इजेमधून किंवा अशा इजांच्या संयोगातून कायमची अंशतः निःसमर्थता निष्पन्न होते असे मानण्यात येईल ;

[२][(च) "आणीबाणीचा कालावधी" याचा संविधानातील ३५२ व्या अनुच्छेदाच्या खंड (१) खाली काढलेल्या आणीबाणीच्या उद्घोषणेच्या संबंधातील अर्थ,—

(एक) २६ ऑक्टोबर, १९६२ रोजी, दिनांक २६ ऑक्टोबर, १९६२ ला सुरू होणारा व १० जानेवारी, १९६८ ला म्हणजे ज्या दिनांकाला भारत सरकार, गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ९३, दिनांक १० जानेवारी, १९६८ याद्वारे उक्त आणीबाणी संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात आले त्या दिनांकाला संपणारा कालावधी, असा आहे ;

(दोन) ३ डिसेंबर, १९७१ रोजी, दिनांक ३ डिसेंबर, १९७१ ला सुरु होणारा आणि ज्या दिनांकास उक्त आणीबाणी संपुष्टात येणार असल्याचे केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जाहीर करील त्या दिनांकाला संपणारा कालावधी, असा आहे ;]

(छ) "विहित" याचा अर्थ, कलम २२ खाली केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ज) "संपूर्ण निःसमर्थता" याचा अर्थ, कामगाराला इजा पोचली त्यावेळी तो जे काम पार पाडण्यास समर्थ होता ती सर्व कामे पार पाडण्यास तो ज्यामुळे असमर्थ होतो आणि तात्पुरत्या स्वरूपाची किंवा कायम स्वरूपाची ती निःसमर्थता, असा आहे :

---

१. १ नोव्हेंबर, १९६५— पहा, अधिसूचना क्र.एस.ओ.३३८२, दिनांक १८ ऑक्टोबर, १९६५;
पहा.— गॅझेट ऑफ इंडिया, १९६५— भाग दोन, उप विभाग ३(२) इंग्रजी पृष्ठ ३५७०.

२. १९७१चा अधिनियम ७५, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

परंतु, जेव्हा अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक इजेच्या किंवा इजांच्या कोणत्याही संयोगाच्या उल्लेखासमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे निःसमर्थतेची टक्केवारी किंवा एकंदर टक्केवारी ही शंभर टक्के किंवा त्याहून अधिक असेल तेव्हा, अशा इजेमधून किंवा इजांच्या संयोगातून कायमची पूर्ण निःसमर्थता निष्पन्न होते असे मानण्यात येईल ;

(झ) " योजना " याचा अर्थ, कलम ८, पोट कलम (१) मध्ये निर्देशिलेली " शारीरिक इजा (भरपाई विमा) योजना, " असा आहे ;

(ञ) " वेतन " याचा अर्थ, " कामगार भरपाई अधिनियम, १९२३ " (१९२३ चा ८) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे वेतन, असा आहे, व " मासिक वेतन " याला " कामगार भरपाई अधिनियम, १९२३ " (१९२३ चा ८) कलम ५ मध्ये त्या शब्दप्रयोगाला नेमून दिलेला अर्थ आहे, आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ त्या कलमामध्ये नेमून दिलेल्या रीतीने परिगणना करून ते ठरवले जाईल ;

(ट) " कामगार " याचा अर्थ, (जिचा रोजगार नैमित्तिक स्वरूपाचा आहे व नियोक्त्याच्या उदीमाची किंवा धंद्याचे प्रयोजन सोडून एरव्ही जी कामाला लावलेली आहे ती व्यक्ती सोडून अन्य अशी, जी व्यक्ती, कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही कामधंद्यात लावलेली असेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे.

## प्रकरण दोन

## या अधिनियमाखाली प्रदेय असणारी भरपाई

**ज्यांना हा अधिनियम लागू होतो ते कामगार.**

**३.** ज्यांना हा अधिनियम लागू होतो ते म्हणजे पुढील कामगार होत :—

(क) " भारत संरक्षण नियम, १९६२ " चा नियम १२६ कक याखाली [1][ किंवा " भारत संरक्षण नियम, १९७१ " चा नियम ११९ या खाली ] अत्यावश्यक सेवा म्हणून जो घोषित केलेला आहे किंवा केलेला होता अशा कोणत्याही कामधंद्यामध्ये किंवा अशा वर्गातील कामधंद्यामध्ये कामाला असलेले कामगार ;

(ख) " कारखाने अधिनियम, १९४८ " (१९४८ चा ६३) कलम २, खंड (ड) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही कारखान्यात कामाला असलेले कामगार ;

(ग) " खाण अधिनियम, १९५२ " (१९५२ चा ३५) याच्या अर्थानुसार कोणत्याही खाणीमध्ये कामाला असलेले कामगार ;

(घ) कोणत्याही मोठ्या बंदरामध्ये कामाला असलेले कामगार ;

(ङ) " मळे कामगार अधिनियम, १९५१ " (१९५१ चा ६९) कलम २, खंड (च) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही मळ्यामध्ये कामाला असलेले कामगार ;

(च) केंद्र सरकारने अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कामधंद्यामध्ये कामाला असलेले कामगार.

**या अधिनियमाखाली प्रदेय असलेली भरपाई कोणी व कशी द्यावयाची.**

**४.** (१) जी व्यक्ती म्हणजे हा अधिनियम लागू होणारा कामगार आहे त्या व्यक्तीला पोचलेल्या शारीरिक इजेबाबत " शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२ " (१९६२ चा ५९) याखाली उपबंधित केलेल्या कोणत्याही अनुतोषाशिवाय आणखी, कलम ७ खाली उपबंधित केलेल्या रकमेची व त्या प्रकारची भरपाई योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, नियोक्त्याकडून प्रदेय असेल :

परंतु, जेव्हा एखाद्या नियोक्त्याने कलम ९ चे पोट कलम (१) द्वारा आवश्यक असलेले विमापत्र काढलेले असेल आणि योजनेच्या उपबंधानुसार मागाहून त्याच्याकडून देय होणाऱ्या सर्व रकमा त्यावरील अधिमूल्य म्हणून भरलेल्या असतील किंवा जेव्हा कलम ९ चे पोट कलम (१) किंवा कलम १० चे पोट कलम (२) याच्या उपबंधानुसार नियोक्त्याने विमा उतरवणे आवश्यक नसेल तेव्हा, या पोट कलमाखाली भरपाई देण्याचे नियोक्त्याचे दायित्व नियोक्त्याच्या वतीने केंद्र सरकार पत्करील व पार पाडील.

(२) या अधिनियमाखाली प्रदेय असणारी भरपाई याबाबतीत योजनेमध्ये केलेल्या उपबंधानुसार द्यावी लागेल.

(३) हे कलम शासनाला बंधनकारक असेल.

**हा अधिनियम किंवा १९६२ चा अधिनियम ५९ याखालील अधिकाराहून अन्यथा भरपाई मिळवण्याच्या अधिकारावरील मर्यादा.**

**५.** ज्या शारीरिक इजेबाबत या अधिनियमाखाली भरपाई प्रदेय आहे तिच्याबाबत एखाद्या व्यक्तीला जेव्हा हा अधिनियम किंवा " शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२" (१९६२ चा ५९) यांच्या उपबंधांव्यतिरिक्त नियोक्त्याकडून भरपाई (मग ती उपदान, बैठे वेतन, अनुकंपा प्रदान या स्वरूपाची असो किंवा अन्य स्वरूपाची असो) किंवा नियोक्त्यांकडून नुकसानी मिळण्याचा भरपाई अधिकार असेल तेव्हा, अशी भरपाई किंवा नुकसानी या अधिनियमाखाली प्रदेय असणाऱ्या भरपाईच्या रकमेतून जेवढ्या रकमेने जास्त असेल तेवढ्यापुरतीच त्या अधिकाराची व्याप्ती असेल.

---

१. १९७१ चा अधिनियम ७५, कलम ३ द्वारे " भारत संरक्षण नियम, १९६२ " याऐवजी घातले.

**शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधातील विशेष उपबंध.**

६. जेव्हा शासनाच्या नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ह्या अधिनियमाखाली ज्या शारीरिक इजेबाबत भरपाई प्रदेय आहे तिच्याबाबतीत या अधिनियमाचे उपबंध किंवा "शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२" (१९६२ चा ५९) याचे उपबंध यांच्याव्यतिरिक्त तिच्या सेवा शर्तीचे विनियमन करणाऱ्या नियमांखाली शासनाकडून कोणतीही रक्कम, असाधारण बैठे वेतन, उपदान, अनुकंपा प्रदान म्हणून किंवा नुकसानी म्हणून मिळण्याचा अधिकार असेल तेव्हा, या अधिनियमात किंवा "शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२" (१९६२ चा ५९) यात काहीही अंतर्भूत असेल तरी, त्या व्यक्तीला त्या नियमांखालील अनुज्ञेय रक्कम मिळण्याचा अधिकार असेल आणि अशी अनुज्ञेय रक्कम हा अधिनियम आणि "शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२" (१९६२ चा ५९) याखाली भरपाई म्हणून प्रदेय असणाऱ्या रकमेहून जर कमी असेल तर, त्या अधिनियमांखालील अनुज्ञेय रक्कम व या अधिनियमाखाली प्रदेय असणारी भरपाईची रक्कम यांतील फरकाइतकी रक्कम मिळण्याचा तिला आणखी अधिकार असेल.

**भरपाईची रक्कम.**

७. (१) या अधिनियमाखाली प्रदेय असणारी भरपाई पुढीलप्रमाणे असेल :—

(क) जेव्हा इजेच्या परिणामी मृत्यू घडून येतो तेव्हा, 'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' (१९२३ चा ८) खाली तशाच प्रकरणी प्रदेय असणारी रक्कम 'शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५९) याखाली प्रदेय असणाऱ्या रकमेच्या ठोक रकमी मुल्याने कमी केली असता येणारी रक्कम ;

(ख) जेव्हा इजेच्या परिणामी कायमची संपूर्ण निःसमर्थता निर्माण होते तेव्हा, 'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' (१९२३ चा ८) याखाली तशाच प्रकरणी प्रदेय असणारी रक्कम 'शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५९) याखाली प्रदेय असणाऱ्या रकमेच्या ठोक रकमी मुल्याने कमी केली असता येणारी रक्कम ;

(ग) जेव्हा इजेच्या परिणामी कायमची अंशतः निःसमर्थता निर्माण होते तेव्हा,—

(एक) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इजेच्या बाबतीत, कायमच्या संपूर्ण निःसमर्थतेच्या बाबतीत जितकी भरपाई प्रदेय झाली असती तिची त्या अनुसूचीत निःसमर्थतेची टक्केवारी म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या एवढी टक्केवारी ;

(दोन) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या इजेच्या बाबतीत, 'शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५९) याखाली केलेल्या योजनेअन्वये कार्य करणाऱ्या सक्षम वैद्यकीय प्राधिकरणाने तत्सम प्रमाणाची निःसमर्थता म्हणून ठरवलेल्या निःसमर्थतेबद्दल अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भरपाईची टक्केवारी ;

(तीन) जेव्हा एकापेक्षा अधिक इजा पोचलेल्या असतील तेव्हा, त्या इजांच्या बाबतीत प्रदेय असणारी एकंदर भरपाई,— तथापि, ती अशी की, जर इजेमुळे कायमची संपूर्ण निःसमर्थता निर्माण झाली असती तर जी प्रदेय झाली असती त्या भरपाईपेक्षा ती कोणत्याही परिस्थितीत जास्त असणार नाही ;

(घ) जेव्हा इजेच्या परिणामी संपूर्ण किंवा अंशतः तात्पुरती निःसमर्थता निर्माण होते तेव्हा, 'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' (१९२३ चा ८) याखाली तशाच प्रकरणी प्रदेय असलेल्या अर्धमासिक रकमा प्रत्येक प्रकरणी जोपर्यंत त्या कामगाराला, 'शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५९) याखाली केलेल्या योजनेखालील कोणतेही प्रदान मिळत असेल तोपर्यंत, उक्त योजनेखाली प्रदेय असणाऱ्या रकमेने कमी केल्या असता येणाऱ्या रकमा.

(२) जेव्हा कामगाराचे वेतन पाचशे रुपयांहून अधिक असेल तेव्हा, या अधिनियमाखाली प्रदेय असणारी भरपाई म्हणजे ज्या कामगाराचे मासिक वेतन चारशे रुपयांहून अधिक आहे त्याच्या बाबतीत पोट-कलम (१) च्या उपबंधाखाली प्रदेय असणारी रक्कम असेल.

## प्रकरण तीन

## शारीरिक इजा (भरपाई विमा) योजना

**शारीरिक इजा (भरपाई विमा) योजना.**

८. (१) केंद्र सरकारला अधिसूचनेद्वारे 'शारीरिक इजा (भरपाई विमा) योजना' नावाची एक योजना प्रवर्तित करता येईल व त्या योजनेमध्ये या अधिनियमांची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींसाठी उपबंध केलेला असेल आणि हा अधिनियम ज्यांना लागू होतो त्या कामगारांच्या नियोक्त्यांच्या संबंधात, केंद्र सरकारला ती द्वारे, हा अधिनियम आणि ही योजना यांच्याखाली अशा नियोक्त्यांवर कामगारांबद्दलची जी दायित्वे येतात त्यांच्याबाबत त्यांचा विमा उतरविण्याचे दायित्व पत्करावे लागेल :

[१][ परंतु, वेगवेगळ्या आणीबाणीच्या कालावधीच्या संबंधात वेगवेगळ्या योजना प्रवर्तित करण्यात येतील.]

---

१. १९७१ चा अधिनियम ७५, कलम ४ द्वारे समाविष्ट केले.

(२) या योजनेखालील विमाकार म्हणून केंद्र सरकारचे कोणतेही दायित्व, केंद्र सरकारच्या वतीने कार्य करणाऱ्या व्यक्तीने विहित नमुन्यात काढलेल्या विमापत्राद्वारे निश्चित करण्यात येईल, याची या योजनेद्वारे निश्चिती केली जाईल.

(३) योजनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास ती प्रवर्तित होईल किंवा प्रवर्तित झाल्याचे मानण्यात येईल, असा उपबंध करता येईल.

(४) ही योजना केंद्र सरकारला कोणत्याही वेळी विशोधित करता येईल.

(५) पोट कलम (१) च्या उपबंधाच्या व्यापकतेला बाध न येता, योजनेद्वारे,—

(क) योजनेने आवश्यक केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या व्यतिक्रमणाबद्दल जास्तीत जास्त दोन हजार रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या रुपाने शिक्षा देण्याच्या उपबंधांनासुद्धा, अधिनियम व ही योजना याखाली प्रदेय असणारी भरपाई देण्याचे विनियमन करणारे उपबंध करता येतील ;

(ख) या अधिनियमाखालील प्रदाने, कोणत्या व्यक्तींना आणि कोणत्या प्रमाणात व कोणत्या रीतीने केली जातील ते विनिर्दिष्ट करणारे उपबंध करता येतील ;

(ग) 'शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५९) याखाली प्रदेय असणाऱ्या पैशाचे ठोक रकमी मूल्य निश्चित करणारे उपबंध करता येतील ;

(घ) कोणत्या स्थितीमुळे किंवा परिस्थितीमुळे या अधिनियमाखाली प्रदेय असणाऱ्या भरपाईपासून कामगार हक्कवंचित होईल ते विनिर्दिष्ट करता येईल, आणि अशी विनिर्दिष्ट केलेली गोष्ट दुर्लक्षून भरपाई देणे हे विमापत्राच्या व्याप्तीत येत नाही अशी या योजनेखाली काढलेल्या कोणत्याही विमापत्राची ती व्यक्त किंवा उपलक्षित शर्त करता येईल ;

(ङ) जर 'शारीरिक इजा (आणीबाणी उपबंध) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ५९) याखाली केलेल्या योजनेखालील निवाडा राखून ठेवलेला असेल, रद्द केलेला असेल, त्याची रक्कम कमी केलेली असेल किंवा तो पुनर्विलोकित केलेला असेल तर, कामगाराला प्रदेय असलेली भरपाई कोणत्या स्थितीत किंवा परिस्थितीत रोखून ठेवण्यात येईल, रद्द करण्यात येईल, कमी करण्यात येईल किंवा पुनर्विलोकित करण्यात येईल ते विनिर्दिष्ट करता येईल ;

(च) या अधिनियमाद्वारे लादलेले दायित्व अंशतः किंवा संपूर्णतः नियोक्त्याने स्वेच्छेने पत्करलेले असेल त्या प्रकरणासंबंधी उपबंध करता येईल ;

(छ) योजनेखालील विमापत्रावर देय असणारे एकूण अधिमूल्य म्हणजे नियोक्त्याने अगोदरच भरलेल्या सर्व आगाऊ विमा हप्त्याचे सममूल्य म्हणून किंवा नियोक्त्याने आगाऊ भरलेल्या कोणत्याही हप्त्याची रक्कम ज्या कालावधींना अनुलक्षून ठरवण्यात आली होती त्या कालावधीच्या त्याच्या एकूण वेतन देयकांची अमुक एक टक्केवारी म्हणून किंवा आणीबाणी संपण्याच्या लगतपूर्वीचे कमीत कमी बारा महिने किंवा जास्तीत जास्त पंधरा महिने इतक्या कालावधीच्या त्याच्या एकूण वेतन देयकांची अमुक एक टक्केवारी म्हणून अंतिम निर्धारण करण्याबाबत, आणि नियोक्त्याचा धंदा बंद पडल्यामुळे आणीबाणीचा कालावधी संपण्यापूर्वी जे विमापत्र अंमलात असण्याचे बंद झाले त्या विमापत्रावर देय असलेल्या एकूण अधिमूल्याचे निर्धारण करण्याबाबत उपबंध करता येतील ;

(ज) विमापत्रावरून देय असलेले एकूण अधिमूल्य नियोक्त्याकडून वसूल करण्याबाबत उपबंध करता येईल—कोणत्याही विहित कालावधीच्या त्याच्या एकूण वेतन देयकाच्या टक्केवारीवर आधारलेल्या रकमेची नियतकालिक आगाऊ प्रदाने करणे, प्रत्येक नियोक्त्याने अशा तऱ्हेने दिलेल्या रकमांचे वेगवेगळे निधी तयार करणे आणि अशा नियतकालिक प्रदानांच्या एकूण रकमेशी अंतिमतः निर्धारित केलेल्या एकूण अधिमूल्याचे अखेरीस समायोजन करणे या मार्गांनी अधिमूल्य वसूल करण्याबाबतचा उपबंध त्यामध्ये समाविष्ट आहे :

परंतु, जेव्हा विहित कालावधीच्या एकूण वेतन देयकावर आधारलेले नियतकालिक प्रदान आठ रुपयांपेक्षा कमी असेल तेव्हा, ते आठ रुपयांपर्यंत वाढविले जाईल :

परंतु आणखी असे की, अशा नियतकालिक प्रदानांपैकी पहिले प्रदान हे, पूर्वोक्तानुसार किमान आठ रुपये इतके असले पाहिजे या शर्तीच्या अधीनतेने, याबाबतीत केंद्र सरकार विनिर्दिष्ट करील अशा दराने असेल :

परंतु आणखी असे की, अशी नियतकालिक प्रदाने वर्षाच्या प्रत्येक तिमाहीत एकापेक्षा अधिक वेळा करावी लागणार नाहीत :

परंतु, आणखी असे की, पहिल्या नियतकालिक प्रदानानंतरच्या कोणत्याही नियतकालिक प्रदानाचा दर पूर्वोक्तानुसार किमान आठ रुपये इतका असला पाहिजे या शर्तीच्या अधीनतेने, केंद्र सरकार या अधिनियमाखालील आपली दायित्वे विचारात घेऊन वेळोवेळी निश्चित करील तितका तो असेल आणि निधीमधील एकूण रकमेची तशी आवश्यकता असेल तर, केंद्र सरकारला कोणत्याही नियतकालिक प्रदानावरील हक्क वर्जिता भरता येईल किंवा त्याची बजावणी पुढे ढकलता येईल.

**सक्तीचा विमा.**

९. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर ज्याचे कोणत्याही तिमाहीचे वेतन देयक पंधराशे रुपयांपेक्षा कधीही जास्त झालेले नाही तो नियोक्ता खेरीजकरून, ज्याला ज्याला हा अधिनियम लागू होतो किंवा मागाहून तो लागू केलेला आहे असा प्रत्येक कामगार-नियोक्ता विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी किंवा तो प्रथमत: जेव्हा असा नियोक्ता झाला त्यानंतर विहित असेल असा कालावधी संपण्यापूर्वी, या योजनेनुसार काढलेल्या ज्या विमापत्राद्वारे तो या अधिनियमाखाली त्याच्यावर लादलेल्या सर्व दायित्वांपुरता आणीबाणीचा कालावधी संपेपर्यंत, किंवा तो आणीबाणीचा कालावधी संपण्यापूर्वी हे कलम ज्याला लागू होते असा नियोक्ता असण्याचे थांबल्यास त्या दिनांकापर्यंत विमारक्षित होईल असे विमापत्र काढील.

(२) जो कोणी पोट कलम (१) च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करील किंवा त्या पोट कलमाच्या आवश्यकतेप्रमाणे विमापत्र काढलेले असता या योजनेच्या उपबंधांनुसार मागाहून त्याच्याकडून विमामूल्य म्हणून देय होणारे कोणतेही प्रदान करण्यास चुकेल तो, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल आणि याप्रमाणे दोषी ठरल्यानंतर ज्या ज्या दिवशी असे व्यतिक्रमण किंवा चुकवणे चालू राहील त्या प्रत्येक दिवसामागे एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडास पात्र असेल.

(३) हे कलम शासनाला बंधनकारक असणार नाही.

**प्रकर्ते व कंत्राटदार.**

१०. (१) जेव्हा एखादी व्यक्ती (या कलमात ' प्रकर्ता ' म्हणून निर्देशिलेली) आपला उदीम किंवा धंदा यांच्या ओघात किंवा त्यांच्या प्रयोजनार्थ, एखाद्या कामगाराने ज्या दुसऱ्या व्यक्तीबरोबर नोकरीची किंवा शिकाऊ उमेदवारीची संविदा केलेली आहे तिच्याबरोबर केलेल्या व्यवस्थेअन्वये आपणास त्या कामगाराच्या सेवा तात्पुरत्या उसनवार दिल्या किंवा भाड्याने दिल्या असता त्यांचा उपयोग करील अथवा आपला उदीम किंवा धंदा त्यांच्या ओघात किंवा त्यांच्या प्रयोजनार्थ, सर्वसामान्यपणे प्रकर्त्याच्या उदीमाचा किंवा धंद्याचा भाग असलेले असे कोणतेही काम संपूर्णपणे किंवा त्याचा कोणताही भाग अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी किंवा तिच्या देखरेखीखाली पार पाडला जावा अशी त्या अन्य व्यक्तींबरोबर (या कलमात अशा दोन्ही अन्य व्यक्ती ' कंत्राटदार ' म्हणून निर्देशिलेल्या आहेत) संविदा करील तेव्हा, प्रकर्ता कलम ११ खाली कार्य करणाऱ्या केंद्र सरकारच्या ज्या एजंटामार्फत विमा उतरवण्याचा त्याचा विचार असेल त्याचे नाव कंत्राटदाराकडून माहीत करून घेईल आणि त्या कंत्राटदाराबरोबर आपण केलेली व्यवस्था किंवा संविदा यांचे वृत्त त्या एजंटाला कळवील.

(२) या अधिनियमात अन्यत्र काहीही अंतर्भूत असले तरी, पोट कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या अशा कोणत्याही प्रकरणी, कंत्राटदाराला, पोट कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या अशा व्यवस्थेअन्वये ज्यांच्या सेवा उसनवार दिलेल्या आहेत किंवा भाड्याने दिलेल्या आहेत किंवा अशा संविदेअन्वये काम पार पाडण्यासाठी ज्यांच्या सेवांचा उपयोग करून घेतलेला आहे असे जे कामगार कंत्राटदाराने कामावर लावले असतील त्यांच्याबाबतीत या अधिनियमाद्वारे त्यांच्यावर लादलेल्या दायित्वाकरता, जेव्हा व्यवस्था किंवा संविदा एक महिन्यापेक्षा कमी मुदतीची असेल तेव्हा, विमा उतरण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या कलमाची उद्दिष्टे पार पाडणे शक्य व्हावे यासाठी आवश्यक ती कोणतीही माहिती कंत्राटदाराने प्रकर्त्याला पुरविण्याबाबत योजनेद्वारे उपबंध करता येईल—योजनेने आवश्यक केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या व्यतिक्रमणाबद्दल जास्तीत जास्त दोन हजार रुपये इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्याचा उपबंध समाविष्ट आहे.

**केंद्र सरकारने एजंट नेमणे.**

११. या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी नेमलेला आपला एजंट म्हणून कार्य करण्यासाठी आणि अशी नेमणूक केलेल्या व्यक्तीला आपणास योग्य वाटेल असे पारिश्रमिक देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे नेमू शकेल किंवा अशी नेमणूक करण्यास प्राधिकृती देऊ शकेल.

**विवक्षित विमाधंद्याला मनाई.**

१२. (१) ज्या दिनांकास ही योजना अंमलात आणली जाईल त्यानंतर कोणतीही व्यक्ती या योजनेनुसार विमापत्रे देण्यासाठी केंद्र सरकारने आपला एजंट म्हणून प्राधिकृत केलेली व्यक्ती ही भूमिका खेरीजकरून एरव्ही, ज्या दायित्वांकरता योजनेने उपबंध केलेला आहे त्या दायित्वांबाबत भारतातील नियोक्त्यांचा विमा उतरवण्याचा धंदा करणार नाही.

(२) पोट कलम (१) मधील कोणतीही गोष्ट ज्या दिनांकास ही योजना अंमलात आणली गेली त्यापूर्वी काढलेल्या व त्या विमा दिनांकानंतर चालू असलेल्या कोणत्याही विमापत्रास किंवा या अधिनियमाद्वारे लादलेल्या दायित्वापेक्षा अधिक दायित्वे विमारक्षित करणाऱ्या कोणत्याही विमापत्रास लागू होत नाही.

(३) जो कोणी पोट कलम (१) च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करील तो पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि पहिल्या व्यतिक्रमणानंतर ज्या ज्या दिवशी ते चालू राहील त्या प्रत्येक दिवसामागे एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडास पात्र असेल.

**शारीरिक इजा (भरपाई विमा) निधी.**

१३. (१) केंद्र सरकारला संसदेने याबाबतीत कायद्याद्वारे यथायोग्य विनियोजन केल्यानंतर प्रत्येक वित्तीय वर्षात आवश्यक वाटतील अशा रकमा ' शारीरिक इजा (भरपाई विमा) निधी ' (यात यापुढे ' निधी ' म्हणून निर्देशिलेला) नावाच्या निधीकडे बदली करता येईल, मात्र योजनेखालील

विम्याच्या अधिमूल्याच्या रूपाने अथवा कलम १८ खाली गुन्हे आपसात मिटविण्यासाठी भरण्यात आलेल्या रकमांच्या रूपाने अथवा ' फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ' (१८९८ चा ५) याच्या कलम ५४५ खाली न्यायालयाने निवाड्याने देववलेल्या खर्चाच्या किंवा भरपाईच्या रूपाने किंवा योजनेखाली लादलेल्या दंडाच्या रूपाने केंद्र सरकारला मिळालेल्या रकमांहून त्या अधिक असता कामा नयेत.

(२) हा अधिनियम किंवा ती योजना याखालील आपली दायित्वे पार पाडण्यासाठी केंद्र सरकारला अथवा योजनेच्या प्रयोजनासाठी नेमलेल्या एजंटाचे पारिश्रमिक किंवा खर्च देण्यासाठी केंद्र सरकारला अथवा योजनेचे प्रशासन करण्याचा खर्च भागवण्यासाठी केंद्र सरकारला लागणाऱ्या सर्व रकमा त्या निधीतून दिल्या जातील :

परंतु, शासनाने कामावर लावलेल्या कामगारांना भरपाई देण्याचे शासनाचे कोणतेही दायित्व निभावण्यासाठी त्या निधीतून कोणतीही रक्कम दिली जाणार नाही.

(३) जेव्हा निधीमधून एखादा भरणा करावयाचा असेल अशा कोणत्याही वेळी, जर निधीच्या खात्यात जमा असलेली रक्कम ही तो भरणा करण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेहून कमी असेल तर, त्या तुटीएवढी रक्कम संसदेने कायद्याद्वारे यथायोग्य विनियोजन केल्यानंतर भारताच्या एकत्रित निधीमधून अग्रिम म्हणून त्या निधीकडे भरली जाईल.

(४) जर कोणत्याही वेळी निधीच्या खात्यात जमा असलेली रक्कम ही, केंद्र सरकारच्या मते निधीमधून भरणा करण्यासाठी जितकी रक्कम लागण्याचा संभव आहे त्या रकमेपेक्षा जास्त असेल तर, त्या जादा रकमेचा केंद्र सरकारला योग्य वाटेल अशा रीतीने विनियोग केला जाईल.

(५) केंद्र सरकार निधीमध्ये जमा झालेल्या व त्यामधून चुकत्या केलेल्या सर्व रकमांचा हिशेब विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने तयार करील व तो दरवर्षी किंवा त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याहून अल्प कालांतरागणिक प्रसिद्ध करील.

## प्रकरण चार

## संकीर्ण

**माहिती मिळविण्याची केंद्र सरकारची शक्ती.**

**१४.** (१) केंद्र सरकारने याबाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या व योजनेच्या आवश्यकतांचे पालन केले गेले आहे की नाही याबाबत खातरजमा करण्यासाठी तिला वाजवी मर्यादेपर्यंत आवश्यक वाटतील असे हिशेब, पुस्तके किंवा अन्य दस्तऐवज आपणापुढे सादर करण्याची किंवा अशी माहिती आपणाला पुरविण्याची किंवा अशी प्रमाणपत्रे देण्याची कोणत्याही नियोक्त्यास विनंती करू शकेल.

(२) कोणतीही व्यक्ती या कलमाखाली आपल्या शक्तींचा वापर करत असताना, जो कोणी तिला अटकाव करील किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनंतीप्रमाणे अनुपालन करण्यास वाजवी सबबी शिवाय कसूर करील तो, जेव्हा जेव्हा असा कोणताही अटकाव किंवा कसूर घडेल त्या प्रत्येक खेपेला एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(३) या कलमाखालील आपल्या आबंधनांचे अनुपालन करण्याचे अभिप्रेत असताना, जो कोणी जाणीवपूर्वक किंवा बेफिकीरपणाने महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटे निवेदन करील तो, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

**न भरलेल्या अधिमूल्याची वसुली.**

**१५.** (१) जेव्हा कोणतीही व्यक्ती, हा अधिनियम किंवा ही योजना यानुसार आवश्यक असल्याप्रमाणे किंवा आवश्यक असेल तितक्या संपूर्ण रकमेचा विमा उतरविण्यास चुकली असेल आणि याप्रमाणे ती चुकली नसती तर, तिला या योजनेच्या उपबंधांनुसार जी कोणतीही रक्कम अधिमूल्याच्या रूपाने भरावी लागली असती ती रक्कम भरण्याचे तिने त्याद्वारे चुकवले असेल तर, कलम ९, पोटकलम (२) च्या उपबंधास बाध न येता, याबाबतीत केंद्र सरकारने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला किती रकमेचा भरणा याप्रमाणे चुकविण्यात आला आहे ते निर्णय करून ठरवता येईल व अशी ठरवलेली रक्कम अशा व्यक्तीकडून प्रदेय असेल व पोटकलम (२) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे तिच्याकडून वसूल करण्याजोगी असेल.

(२) योजनेखाली काढलेल्या विमापत्रावरील अधिमूल्य म्हणून योजनेच्या उपबंधानुसार प्रदेय असलेली कोणतीही रक्कम आणि पोटकलम (१) खाली प्रदेय म्हणून ठरवलेली कोणतीही रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याजोगी असेल.

(३) पोटकलम (१) खाली जिच्याविरुद्ध निर्णय करण्यात आला आहे अशा कोणत्याही व्यक्तीला अशा निर्णयाविरुद्ध विहित कालावधीमध्ये केंद्र सरकारकडे अपील करता येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**नियोक्ता विमा काढण्यास चुकला असेल तर त्याबाबतीत भरपाई देणे.**

१६. जेव्हा एखादा नियोक्ता कलम ९, पोट कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे विमापत्र काढण्यास चुकला असेल किंवा त्या पोट कलमाअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याने विमापत्र काढले असता या योजनेच्या उपबंधांनुसार त्यानंतर त्यावरील अधिमूल्य म्हणून त्याच्याकडून जे भरणे देय आहेत ते करण्यास तो चुकला असेल तेव्हा, या अधिनियमाखाली जी भरपाई रक्कम देण्यास तो दायी असेल अशी कोणतीही रक्कम निधीमधून देता येईल अणि याप्रमाणे चुकती करण्यात आलेली रक्कम व तिच्या जोडीला केंद्र सरकारने याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी ठरवील अशी, त्या चुकत्या रकमेपेक्षा जास्त नाही इतक्या द्रव्यदंडाची रक्कम नियोक्त्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येऊन निधीमध्ये जमा केली जाण्यास पात्र असेल.

**अभियोगांबाबतच्या मर्यादा.**

१७. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही गुन्ह्याबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध केंद्र सरकार किंवा केंद्र सरकारने या बाबतीत प्राधिकृत केलेला प्राधिकारी याच्याखेरीज किंवा त्याच्या संमतीखेरीज कोणालाही कोणताही अभियोग सुरू करता येणार नाही.

**अपराध आपसात मिटवणे.**

१८. कलम ९ च्या पोट कलम (२) खाली शिक्षापात्र असणारा कोणताही अपराध हा अभियोग सुरू करण्यापूर्वी किंवा त्यानंतर केंद्र सरकारला किंवा केंद्र सरकारने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याला निधीमध्ये जमा करण्यासाठी केंद्र सरकार किंवा, प्रकरणपरत्वे, असा प्राधिकारी यांना योग्य वाटेल अशी रक्कम भरण्यास आल्यावर आपसात मिटवता येईल.

**कोणतीही शिक्षा करण्याची दंडाधिकाऱ्यांची शक्ती.**

१९. जेव्हा या अधिनियमाविरुद्ध घडलेल्या कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथमवर्ग दंडाधिकारी यांच्याकडून चालेल तेव्हा, ' फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ' (१८९८ चा ५) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अपराधाची संपरीक्षा करणाऱ्या दंडाधिकाऱ्याला या अधिनियमाखाली प्राधिकृत केलेल्या कोणत्याही शिक्षेचा आदेश काढता येईल.

**वैध कार्यवाहीस आडकाठी.**

२०. (१) जी गोष्ट या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक केलेली आहे किंवा करण्याचे योजलेले आहे अशा कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(२) जे विमापत्र या अधिनियमाखाली काढलेले असेल किंवा त्याखाली काढलेले असावे असे दिसते त्या विमापत्रावर जी रक्कम अधिमूल्याच्या रूपाने भरलेली असेल किंवा तशी भरलेली असावी असे दिसते अशी कोणतीही रक्कम परत मिळण्यासाठी कोणत्याही दिवाणी न्यायालयात केंद्र सरकार किंवा कलम ११ खाली त्याचा एजंट म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा चालवता येणार नाही.

**नियोक्त्यांना सूट देण्याची शक्ती.**

२१. जर एखाद्या नियोक्त्याने या अधिनियमाखाली त्याच्यावर लादण्यात आलेली अशी सारतः तीच दायित्वे समाविष्ट करणारी संविदा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी विमाकारांबरोबर केलेली आहे अशी केंद्र सरकारची खात्री पटली तर, त्या नियोक्त्याला त्याच्या विनंतीवरून केंद्र सरकार ती संविदा चालू असेपर्यंत या अधिनियमाच्या उपबंधांपासून सूट देईल.

**नियम करण्याची शक्ती.**

२२. (१) केंद्र सरकारला या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील गोष्टी विहित करता येतील,—

(क) एखाद्या नियोक्त्याचे एकूण वेतनदेयक विनिश्चित करताना अनुसरावयाची तत्त्वे वेतनाच्या व्याख्येत समाविष्ट असलेले विवक्षित वेतनवर्ग किंवा विवक्षित घटक वगळण्याचा उपबंधही त्यात समाविष्ट आहे ;

(ख) कलम ८ च्या पोट कलम (२) मध्ये निर्देशिलेल्या विमापत्रांचा नमुना ;

(ग) कलम ८ च्या पोट कलम (५) चा खंड (७) या मध्ये निर्देशिलेला कालावधी ;

(घ) कलम ९ च्या पोट कलम (१) मध्ये निर्देशिलेला दिनांक व कालावधी ;

(ङ) कलम १३ च्या पोट कलम (५) मध्ये निर्देशिलेला हिशेब तयार करून प्रसिद्ध करण्याचा नमुना व रीत ;

(च) कलम १५ च्या पोट कलम (३) मध्ये निर्देशिलेला कालावधी ;

(छ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**अडचणींचे निवारण करण्याची शक्ती.**

२३. जर या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवली, आणि विशेषतः या अधिनियमाखाली कोणतीही भरपाई प्रदेय आहे किंवा काय अशी किंवा तिच्या रकमेविषयी जर कोणतीही शंका निर्माण झाली तर, केंद्र सरकारला ती शंका किंवा अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा समयोचित वाटेल असा, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसलेला उपबंध करता येईल किंवा तसा निदेश देता येईल ; आणि अशा प्रकरणी, केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल.

२४. या अधिनियमाखालील केलेली कोणतीही योजना व प्रत्येक नियम, ते करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीमध्ये ठेवले जातील आणि ज्या सत्रात ते याप्रमाणे ठेवले गेले ते किंवा पूर्वोक्त क्रमवर्ती सत्रे संपण्यापूर्वी, जर त्या योजनेत किंवा नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा ती योजना किंवा नियम करण्यात येऊ नये याबाबत सभागृहांचे मतैक्य झाले तर, ती योजना किंवा तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या योजनेखाली किंवा नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

[कलम २ व ७ (१) पहा]

| इजेचे वर्णन | निःसमर्थतेची टक्केवारी |
|---|---|
| **हात** | |
| दोन्ही हात किंवा सर्व बोटे व अंगठे गमावणे .. .. | १०० |
| उजवा बाहू खांद्यामधून कापावा लागणे .. .. | ९० |
| डावा बाहू खांद्यामधून कापावा लागणे .. .. | ९० |
| अंसकूटाच्या टोकापासून ६ इंचापेक्षा जास्त अंतरापर्यंत खांद्याच्या खुंटाखाली कापावा लागणे (उजवा) .. .. | ८० |
| ६ इंचापेक्षा जास्त नाही इतक्या अंतरापर्यंत खांद्याच्या खुंटाखाली कापावा लागणे (उजवा) .. .. | ९० |
| ६ इंचापेक्षा जास्त नाही इतक्या अंतरापर्यंत खांद्याच्या खुंटाखाली कापावा लागणे (डावा) .. .. | ८० |
| अंसकूटाच्या टोकापासून ६ इंचापेक्षा जास्त अंतरापर्यंत खांद्याखाली कापावा लागणे (डावा) .. .. | ८० |
| कोपरामधून किंवा ५ इंचापेक्षा जास्त नाही इतका खुंट उरेल अशा प्रकारे कोपराखाली कापावा लागणे (उजवा) .. .. | ८० |
| कोपरामधून किंवा ५ इंचापेक्षा जास्त नाही इतका खुंट उरेल अशाप्रकारे कोपराखाली कापावा लागणे (डावा) .. .. | ७० |
| ५ इंचापेक्षा जास्त खुंट उरेल अशा प्रकारे कोपराखाली कापावा लागणे (उजवा) | ७० |
| ५ इंचापेक्षा जास्त खुंट उरेल अशा प्रकारे कोपराखाली कापावा लागणे (डावा) | ५० |
| अंगठा गमावणे (उजवा) .. .. | ५० |
| अंगठा गमावणे (डावा) .. .. | ४० |
| ४ बोटे गमावणे (उजवी) .. .. | ५० |
| ४ बोटे गमावणे (डावी) .. .. | ४० |
| कोणत्याही एका हाताची दोन बोटे गमावणे .. .. | २० |
| **पाय** | |
| दोन किंवा अधिक अंगे गमावणे .. .. | १०० |
| दोन्ही पावले कापावी लागणे .. .. | १०० |
| नितंबापासून किंवा ५ इंचापेक्षा जास्त नाही इतका खुंट उरेल अशा प्रकारे नितंबाखाली कापावे लागणे .. .. | ९० |
| दोन्ही पायावर लिस्फ्रॅंकची शस्त्रक्रिया करावी लागणे .. .. | ८० |
| ५ इंचापेक्षा जास्त खुंट उरेल अशाप्रकारे नितंबाखाली कापावे लागणे .. | ८० |

| इजेचे वर्णन | नि:समर्थतेची टक्केवारी |
|---|---|
| चवडा व बोटांची पेरे यांच्यामधील सांध्याच्या अलिकडे दोन्ही पावले कापावी लागणे | ८० |
| चवडा व बोटांची पेरे यांच्यामधील सांध्यामधून दोन्ही पावलांची सर्व बोटे गमावणे | ४० |
| बोटांच्या पेरांमधील पहिल्या साध्यांच्या अलिकडे दोन्ही पावलांची सर्व बोटे गमावणे | ३० |
| बोटांच्या पेरांमधील पहिल्या सांध्याच्या पलिकडे दोन्ही पावलांची सर्व बोटे गमावणे | २० |
| मांडीच्या मध्याखाली, गुडघ्यामधून किंवा ४ इंचापेक्षा जास्त नाही इतका खुंट उरेल अशाप्रकारे गुडघ्याखाली पाय कापावा लागणे .. .. | ७० |
| ४ इंचापेक्षा जास्त खुंट उरेल अशाप्रकारे गुडघ्याखाली पाय कापावा लागणे | ६० |
| एका पायावर लिस्फ्रँकची उच्छेदन शस्त्रक्रिया करावी लागणे .. | ४० |
| चवडा व बोटांची पेरे यांच्यामधील सांध्याच्या अलिकडे एका पावलामधून कापावे लागणे .. .. | ३० |
| चवडा व बोटांची पेरे यांच्यामधील सांध्यामधून झालेली उच्छेदने धरून, बोटांच्या पेरांमधील पहिल्या सांध्याच्या अलिकडे एका पावलाची सर्व बोटे गमावणे | २० |
| **अन्य विनिर्दिष्ट इजा** | |
| हात व पाय गमावणे .. .. | १०० |
| **अन्य नि:समर्थता** | |
| चेहरा गंभीरपणे विद्रूप होणे .. .. | १०० |
| वाचा पूर्णपणे गमावणे .. .. | ७० |
| विनाच्छेद इजेमुळे सांध्याच्या हालचालीवर मर्यादित बंधन पडणे अथवा अस्थिभंगामुळे त्या अंगाच्या कार्यावर मर्यादा पडणे, अथवा कोणत्याही पंजाचा अंगठा किंवा २ किंवा अधिक बोटे यांचा सव्रण अस्थिभंग होऊन त्याच्या कार्यात बिघाड येणे .. .. | २० |

**सर्वाधिक अनुकूल जागी म्हणजे सर्वात जास्त उपयुक्त जागी संधिग्रह**

| बाहू | उजवा टक्केवारी | डावा टक्केवारी |
|---|---|---|
| खांदा .. .. .. | ४० | ३० |
| कोपर .. .. .. | ४० | ३० |
| मनगट .. .. .. | ३० | २० |

| पाय | |
|---|---|
| नितंब .. .. .. .. | ६० |
| गुडघा .. .. .. .. | ४० |
| पायाचा घोटा .. .. .. | ३० |

**सदोष दृष्टी**

| | |
|---|---|
| दृष्टी गमावणे .. .. .. | १०० |
| विकृतिसंकर न होता एक डोळा गमावला जाऊन दुसरा डोळा शाबूत राहणे | ४० |
| विकृतिसंकर होऊन व विद्रूपता येऊन एका डोळयाची दृष्टी जाणे व दुसरा शाबूत राहणे .. .. .. | ४० |
| विकृतिसंकर न होता किंवा विद्रूपता न येता एका डोळ्याची दृष्टी जाऊन दुसरा डोळा शाबूत राहणे. .. .. .. | ३० |

(शा.म.मु.) एच ४१७६—३ (१०३५—३—०७)

# सदोष दृष्टीचे अन्य प्रमाण

| | जेव्हा जास्तीत जास्त दृष्टितीक्ष्णता पुढीलप्रमाणे असेल | | निर्धारण टक्केवारी | | एक डोळा काढून टाकल्यानंतर राहिलेल्या डोळ्यांची जास्तीत जास्त दृष्टितीक्ष्णता चष्म्यासहित किंवा चष्म्याशिवाय | निर्धारण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | एक डोळा | दुसरा डोळा | | | | |
| १. | ६/६ .. | ६/२४ .. | १५.१९ | १. | ६/६ | |
| | किंवा | ६/३६ | | २. | ६/९ | ४० |
| २. | ६/९ | ६/६० .. | २०.०० | ३. | ६/१२ | |
| | किंवा | ३/६० | | | | |
| ३. | ६/१२ | काही नाही .. | ३०.०० | ४. | ६/१८ | ५० |
| ४. | ६/१८ | ६/१८ .. | १५.१९ | ५. | ६/२४ | ७० |
| ५. | ६/१८ | ६/२४ .. | ३०.०० | ६. | ६/३६ | ८० |
| ६. | ६/१८ | ६/३६ | ... | ७. | ६/६० | |
| ७. | ६/१८ | ६/६० .. | ४०.०० | ८. | ३/६० | ९० |
| ८. | ६/१८ | ६/६० | ... | | ... | |
| ९. | ६/१८ | काही नाही .. | ५०.०० | | ... | ... |
| १०. | ६/२४ | ६/२४ .. | ३०.०० | ९. | काही नाही | १०० |
| ११. | ६/२४ | ६/३६ .. | ४०.०० | | ... | ... |
| १२. | ६/२४ | ६/६० .. | ५०.०० | | ... | ... |
| १३. | ६/२४ | ३/६० | | | | |
| १४. | ६/२४ | काही नाही .. | ७०.०० | | ... | ... |
| १५. | ६/३६ | ६/३६ .. | ५०.०० | | ... | ... |
| १६. | ६/३६ | ६/६० .. | ६०.०० | | ... | ... |
| १७. | ६/३६ | ३/६० | | | | |
| १८. | ६/३६ | काही नाही .. | ८०.०० | | ... | ... |
| १९. | ६/६० | ६/६० .. | ८०.०० | | ... | ... |
| २०. | ६/६० | ३/६० | | | | |
| २१. | ६/६० | काही नाही .. | ९०.०० | | ... | ... |
| २२. | ३/६० | ३/६० .. | ८०.०० | | ... | ... |
| २३. | ५/६० | काही नाही .. | ९०.०० | | ... | ... |
| २४. | काही नाही | काही नाही .. | १००.०० | | ... | ... |

## सदोष श्रवणशक्ती

दोन्ही कानांचा एकदम उपयोग होत असताना श्रवणशक्तीला प्राप्त झालेल्या श्रेणीवर निर्धारण आधारलेले असावे ; याप्रमाणे प्राप्त झालेल्या श्रेणीशी संबद्ध असे टक्केवारी निर्धारण शेवटच्या स्तंभात दिले आहे.

| प्राप्त झालेल्या श्रवणशक्तीची श्रेणी | दोन्ही कानांचा एकदम उपयोग होत असता त्याबाबतचे निर्धारण |
|---|---|
| १ ठार बहिरेपणा .. .. | ८० टक्के |
| २ जास्तीतजास्त ३ फुटांपर्यंतची आरोळी .. .. | ७० टक्के |
| ३ जास्तीतजास्त १ फुटांपर्यंतचा संभाषणाचा आवाज .. | ६० टक्के |
| ४ जास्तीतजास्त ३ फुटांपर्यंतचा संभाषणाचा आवाज .. | ४० टक्के |
| ५ जास्तीतजास्त ६ फुटांपर्यंतचा संभाषणाचा आवाज .. | २० टक्के |
| ६ जास्तीतजास्त ९ फुटांपर्यंतचा संभाषणाचा आवाज | |
| (क) एक कान पूर्णपणे बहिरा .. | २० टक्के |
| (ख) अन्यथा .. .. | २० टक्यांहून कमी |

एखाद्या बाबतीत उजव्या कानाला ४ थ्या श्रेणीची, डाव्या कानाला २ ऱ्या श्रेणीची व दोन्ही कानांचा एकदम उपयोग होत असता त्यांना ३ ऱ्या श्रेणीची श्रवणशक्ती प्राप्त झाली असेल तर, त्याची नोंद पुढीलप्रमाणे करावी :—

उ४ डा २. उ + डा ३. .. .. निर्धारण ६० टक्के

वर दिलेल्या निर्धारणामध्ये, डोकेदुखी, भोवंड येणे, कानात गुणगुण होणे, निद्रानाश, इत्यादींसारखी जी किरकोळ दुखणी बहिरेपणाच्या अनुषंगाने येतात ती लक्षात घेतली आहेत.

## The Personal Injuries (Compensation Insurance) Act, 1963

### शारीरिक इजा (भरपाई विमा) अधिनियम, १९६३

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acuity | दृष्टितीक्ष्णता | [schedule] |
| adjustment | समायोजन | [sec. 8 (5)(H)] |
| advance | अग्रीम | [sec. 13 (3)] |
| aforesaid | पूर्वोक्त | [sec. 8 (5)(H)(pro.)] |
| amputation | उच्छेद | [schedule] |
| apprentice | शिकाऊ उमेदवार | [sec. 2 (a)] |
| arrangement | व्यवस्था | [sec. 10 (2)] |
| assessment | निर्धारण | [schedule] |
| at intervals | कालांतरागणिक | [sec. 13 (5)] |
| authorise | प्राधिकृत | [sec. 11] |
| award | निवाडा | [sec. 8 (5)(e)] |
| binding | बंधनकारक | [sec. 4 (3)] |
| body of person | व्यक्तिनिकाय | [sec. 2 (a)] |
| calculation | परिगणना | [sec. 2 (j)] |
| casual | नैमित्तिक | [sec. 2 (k)] |
| combination | संयोग | [sec. 2 (e)] |
| compassionate payment | अनुकंपा प्रदान | [sec. 5] |
| compensation | भरपाई | [sec. 1 (1)] |
| complication | विकृतिसंकर | [schedule] |
| contract | संविदा | [sec. 10 (2)] |
| contractor | कंत्राटदार | [sec. 10 (M.N.)] |
| contravention | व्यतिक्रमण | [sec. 9 (2)] |
| damages | नुकसानी | [sec. 5] |
| deafness | बहिरेपणा | [schedule] |
| deceased | मृत | [sec. 2 (a)] |
| disentitled | हक्कवंचित | [sec. 8 (5)(d)] |
| disfigurement | विद्रूपता | [schedule] |
| earning capacity | अर्जनक्षमता | [sec. 2 (e)] |
| emergency | आणीबाणी | [sec. 2 (c)] |
| employer | नियोक्ता | [preamble] |
| employment | रोजगार | [sec. 2 (k)] |
| final assessment | अंतिम निर्धारण | [sec. 8 (5)(a)] |
| fine | द्रव्यदंड | [sec. 9 (2)] |
| fracture | अस्थिभंग | [schedule] |

| | | |
|---|---|---|
| gain | प्राप्ती | [sec. 2 (c)] |
| gratuity | उपदान | [sec. 5] |
| half-monthly | अर्धमासिक | [sec. 7 (1)(d)] |
| hearing | श्रवणशक्ती | [schedule] |
| implied condition | उपलक्षित शर्त | [sec. 8 (5)(d)] |
| incorporated | निगमित | [sec. 2 (a)] |
| injury | इजा | [sec. 1 (1)] |
| insurance business | विमाधंदा | [sec. 12 (m.n.)] |
| insured | विमारक्षित | [sec. 9 (1)] |
| insurer | विमाकार | [sec. 8 (2)] |
| joint | सांधा | [schedule] |
| knowingly | जाणीवपूर्वक | [sec. 14 (3)] |
| legal representative | वैध प्रतिनिधी | [sec. 2 (a)] |
| obligation | आबंधन | [sec. 14 (3)] |
| partial disablement | अंशत: नि:समर्थता | [sec. 2 (e)] |
| payable | अनुज्ञेय | [sec. 6] |
| pention | बैठे वेतन | [sec. 5] |
| policy | विमापत्र | [sec. 8 (5)(d)] |
| power | शक्ती | [sec. 14 (m.n.)] |
| premium | अधिमूल्य | [sec. 8 (5)(g)] |
| principal | प्रकर्ता | [sec. 10 (m.n.)] |
| proclamation | उद्घोषणा | [sec. 2 (F)] |
| purporting | अभिप्रेत असणे | [sec. 14 (3)] |
| recklessly | बेफिकीरपणे | [sec. 14 (3)] |
| relief | अनुतोष | [sec. 4 (1)] |
| remuneration | पारिश्रमिक | [sec. 11] |
| review | पुनर्विलोकन | [sec. 8 (5)(e)] |
| sleeplessness | निद्रानाश | [schedule] |
| successive sessions | क्रमवर्ती सत्रे | [sec. 24] |
| to ascertain | विनिश्चित करणे | [sec. 22 (2)(a)] |
| total disablement | संपूर्ण नि:समर्थता | [sec. 2 (h)] |
| trade | उदीम | [sec. 2 (k)] |
| vertigo | भोवंड | [schedule] |
| without penetration | विनाच्छेद | [schedule] |
| workman | कामगार | [sec. 8 (5)(d)] |

## शारीरिक इजा (भरपाई विमा) अधिनियम, १९६३

# THE PERSONAL INJURIES (COMPENSATION INSURANCE) ACT, 1963

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अग्रिम | advance | [कलम १६ (३)] |
| अधिमूल्य | premium | [कलम ८ (५)(छ)] |
| अनुकंपा प्रदान | compassionate payment | [कलम ५] |
| अनुतोष | relief | [कलम ४ (१)] |
| अनुज्ञेय | payable | [कलम ६] |
| अभिप्रेत असणे | purporting | [कलम १४ (३)] |
| अर्जनक्षमता | earning capacity | [कलम २ (ङ)] |
| अर्धमासिक | half-monthly | [कलम ७ (१)(घ)] |
| अस्थिभंग | fracture | [अनुसूची] |
| आणीबाणी | emergency | [कलम २ (ग)] |
| आबंधन | obligation | [कलम १४ (३)] |
| अंतिम निर्धारण | final assessment | [कलम ८ (५)(छ)] |
| अंशतः निःसमर्थता | partial disablement | [कलम २ (ङ)] |
| उच्छेद | amputation | [अनुसूची] |
| उदीम | trade | [कलम २ (ट)] |
| उद्‌घोषणा | proclamation | [कलम २ (च)] |
| उपदान | gratuity | [कलम ५] |
| उपलक्षित शर्त | implied condition | [कलम ८ (५)(घ)] |
| इजा | injury | [कलम १ (१)] |
| कामगार | workman | [कलम ८ (५)(घ)] |
| कालांतरागणिक | at intervals | [कलम १३ (५)] |
| क्रमवर्ती सत्रे | suceesive sessions | [कलम २४] |
| कंत्राटदार | contractor | [कलम १० (स.टी.)] |
| जाणीवपूर्वक | knowingly | [कलम १४ (३)] |
| द्रव्यदंड | fine | [कलम ९ (२)] |
| दृष्टितीक्ष्णता | acuity | [अनुसूची] |
| नुकसानी | damages | [कलम ५] |
| निगमित | incorporated | [कलम २ (क)] |
| निद्रानाश | sleeplessness | [अनुसूची] |
| नियोक्ता | employer | [उद्देशिका] |
| निर्धारण | assessment | [अनुसूची] |
| निवाडा | award | [कलम ८ (५)(ङ)] |
| नैमित्तिक | casual | [कलम २ (८)] |
| परिगणना | calculation | [कलम २ (ञ)] |

| | | |
|---|---|---|
| पारिश्रमिक | remuneration | [कलम ११] |
| पुनर्विलोकन | review | [कलम ८ (५)(ङ)] |
| पूर्वोक्त | aforesaid | [कलम ८ (१)(ज)परंतुक] |
| प्रकर्ता | principal | [कलम १० (स.टी.)] |
| प्राधिकृत | authorise | [कलम ११] |
| प्राप्ती | gain | [कलम २ (ग)] |
| बहिरेपणा | deafness | [अनुसूची] |
| बेफिकीरपणे | recklessly | [कलम १४ (३)] |
| बैठे वेतन | pension | [कलम ५] |
| बंधनकारक | binding | [कलम ४ (३)] |
| भरपाई | compensation | [कलम १ (१)] |
| भोवंड | vertigo | [अनुसूची] |
| मृत | deceased | [कलम २ (क)] |
| रोजगार | employment | [कलम २ (८)] |
| विकृतिसंकर | complication | [अनुसूची] |
| विद्रूपता | disfigurement | [अनुसूची] |
| विनाच्छेद | without penetration | [अनुसूची] |
| विनिश्चित करणे | to ascertain | [कलम २२ (२)(क)] |
| विमाकार | insurer | [कलम ८ (२)] |
| विमाधंदा | insurance business | [कलम १२ (स.टी.)] |
| विमापत्र | policy | [कलम ८ (५)(घ)] |
| विमारक्षित | insured | [कलम ९ (१)] |
| व्यक्तिनिकाय | body of persons | [कलम २ (क)] |
| व्यतिक्रमण | contravention | [कलम ९ (२)] |
| व्यवस्था | arrangement | [कलम १० (२)] |
| वैध प्रतिनिधी | legal representative | [कलम २ (क)] |
| शक्ती | power | [कलम १४ (स.टी.)] |
| शिकाऊ उमेदवार | apprentice | [कलम २ (क)] |
| श्रवणशक्ती | hearing | [अनुसूची] |
| समायोजन | adjustment | [कलम ८ (५)(ज)] |
| सांधा | joint | [अनुसूची] |
| संपूर्ण निःसमर्थता | total disablement | [कलम २ (ज)] |
| संयोग | combination | [कलम २ (ङ)] |
| संविदा | contract | [कलम १० (२)] |
| हक्कवंचित | disentitled | [कलम ८ (५)(घ)] |